स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेडच्या सामाजिकशास्त्रे विद्याशाखांतर्गत इतिहास विषयातील पीएच.डी. पदवीच्या नियोजित संशोधनासाठी सादर करावयाचा आराखडा

"छत्रपती संभाजी महाराजावरील ऐतिहासिक लिखानाचा चिकित्सक अभ्यास"

संशोधक

शिंदे संदिप शिवाजीराव

एम.ए., सेट

संशोधन मार्गदर्शक

डॉ. पिसे जी.एस.

सहाय्यक प्राध्यापक व संशोधन मार्गदर्शक

इतिहास विभाग

ज्ञानोपासक शिक्षण मंडळाचे

कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, परभणी.

मो.नं. 9403601436

इ-मेल : dr.

एप्रिल – २०१९

"छत्रपती संभाजी महाराजावरील ऐतिहासिक लिखानाचा चिकित्सक अभ्यास"

प्रस्तावना :

शिवाजी महाराजांनी संघर्ष करुन हिंदवी स्वराज्याची स्थापना केली. इ.स. १६७४ मध्ये विधियुक्त राज्यभिषेक करुन शिवाजी महाराज मराठी स्वराज्याचे छत्रपती बनले. त्याचवेळी मराठी स्वराज्याचा पहिला युवराज म्हणून संभाजी महाराजांचा अभिषेक करण्यात आला. इ.स. १६८० मध्ये छत्रपती शिवाजी महाराजांच्या मृत्यूनंतर मराठी स्वराज्याचे दुसरे छत्रपती म्हणून युवराज संभाजी राजांनी राज्यभिषेक केला. संभाजी महाराज छत्रपती बनल्यावर त्यांना खूप मोठ्या संघर्ष करावा लागला. स्वराज्यामधील कटकारस्थानापासून ते बाह्य आक्रमणालापर्यंत संभाजी महाराजांनी तोंड दिले. या संघर्षामुळे इ.स. १६८१-८९ हा काळ अत्यंत वादळी ठरला. परंतु संभाजी महाराजांच्या मृत्यूनंतर सुध्दा त्यांची कारकीर्द वादळी ठरवली गेली. छत्रपती संभाजी महाराजांच्या मृत्युनंतर एकही बखरकार किंवा इतिहासकार त्यांना अनुकुल नव्हता. सगळे प्रतिकुल होते. त्यांनी संभाजी महाराजाविषयी प्रतिकुल लिहिले. समकालीन असलेला सभासदसुध्दा दरबारी भाटा प्रमाणे लिखान करताना दिसतो. राजारामाची बाजू उचलून घेऊन संभाजी महाराजांना नाकर्ता राज्यकर्ता सिध्द करण्याचा प्रयत्न करतो. चिटणिसाने तर सर्व मर्यादा सोडून संभाजी महाराजावर बेछूट आरोप करत सुटतो. या सभासद व चिटणिसाचा आधार घेऊन अनेक इतिहासकारांनी संभाजी महाराजाबद्दल बदनामकारक मजकूर लिहिला आहे. त्यांनी उग्रपृकृती, उतावीळ, रागीट, रंगेल संभाजी प्रतिपादन केला आहे. बखर वाङमयाची थोडी सुध्दा शहनिशा केली नाही. मूळ कागदपत्राच्या आधारे इतिहास मांडण्याचा प्रयत्न केला नाही. पक्षपाती व पूर्वगृह दूषीतपणाने इतिहास लेखन केले. इ.स. १९६० नंतर अनेक नवीन संशोधक समोर आले, त्यांनी संभाजी महाराजाच्या चरित्राचा पुनर्विचार करायला सुरुवात केली. या नव्या संशोधनातून खरा व वास्तवदर्शी संभाजी जगासमोर आला. यामध्ये प्रामुख्याने वा.सि. बेंदे, कमल गोखले, सदाशिव शिवदे, जयसिंगराव पवार इत्यादी इतिहास लेखकांचा समावेश होतो. या इतिहास संशोधकांनी मूळ कागदपत्राचा अभ्यास करुन संभाजी महाराजावरील बदनामीकारक आरोपाचे खंडन केले. पराक्रमी, धाडसी, स्वराज्य रक्षक संभाजी वाचकासमोर उभा केला. या सर्व ग्रंथांचा चिकित्सक अभ्यास प्रस्तुत शोध प्रबंधात अपेक्षित आहे.

मानवी इतिहासात अनेक कर्तृत्ववान महापुरुषांनी आपल्या कार्य कृतृत्वाचा ठसा युगावर कोरलेला आहे. म्हणून या महापुरुषाच्या कार्याची दखल घेतल्याशिवाय इतिहास पूर्ण होऊ शकत नाही. थॉमस कार्याईल हा विचारवंत म्हणतो की, इतिहास हा खऱ्या अर्थाने युगपुरुषाचा इतिहास

आहे. यामध्ये सामान्यांना स्थान नाही.

ऐतिहासिक कालामध्ये अनेक शुरवीर व कर्तृत्ववान व्यक्ती होऊन गेल्या आहेत. मराठ्यांच्या इतिहासामध्ये छत्रपती संभाजी महाराजांनी शौर्य, पराक्रम आणि धाडस या माध्यमातून आपला कार्यकाळ गाजवला आहे. एकाच वेळी अनेक शत्रूशी लढत असताना आपल्या वडिलांनी स्थापन केलेल्या हिंदवी स्वराज्याच्या रक्षणासाठी प्राणाची बाजी लावली. शेवटच्या श्वासापर्यंत स्वराज्यासाठी लढा दिला. यांचे आयुष्य जसे वादळी ठरले. त्याचप्रमाणे त्यांचे चरित्रलेखन सुध्दा वादळी ठरले. छत्रपती संभाजी महाराजांच्या बलिदानानंतर अनेक लेखकांनी संभाजी महाराजांच्या जीवन चरित्रविषयी लिखान केले. यात संभाजी महाराजांच्या मृत्यु नंतर अवघ्या ७/८ वर्षांनी कृष्णाजी अनंत सभासदाने सभासद बखर लिहून काढली. तर चिटणीस वखर संभाजी महाराजांच्या मृत्युनंतर १२२ वर्षांनी लिहून काढली. या दोन्ही बखरकार पक्षपातील पूर्वगृहदुषित होते. म्हणून संभाजी महाराजावर समकालीन कागदपत्रात उल्लेखित नसलेले आरोप लावले. या वखरीमधील आरोप खरे मानून मराठ्यांचा इतिहासकार ग्रँड डफ व सरदेसाई संभाजी महाराजांच्या चरित्राचे लेखन केले. या इतिहासकारांनी लिहिलेला व मांडलेला संभाजी साहित्यिक व सामान्य जनतेपर्यंत पोहचला. सामान्य जनाच्या मनात संभाजी राजांची प्रतिमा मिलन करुन टाकली. क्रुर, जुलमी, उग्रप्रकृती, व्यसनी, भित्री व तिरस्करणीय प्रतिमा निर्माण केली. पण इ.स. १९६० नंतर वा.सि. बेंद्रे, कमल गोखले, जयसिंगराव पवार या लेखकंानी संभाजी महाराजाविषयी चरीत्रलेखन करुन नवसंशोधन करुन खरा व वास्तव संभाजी वाचकांसमोर उभा केला आहे. म्हणून प्रस्तुत संशोधनात बखरकार पूर्वसूरींचे चरित्र लेखन आणि आणि नव संशोधनानुसार खरा व व वास्तवदर्षी संभाजी महाराजांचे चरित्र लेखन करणाऱ्या चरित्रांचा चिकित्सक अभ्यास करण्यात येणार आहे.

१) समस्यासूत्रण :

संभाजी महाराजांच्या मृत्यूनंतर बखरकारांनी त्याच्याविषयी लिखान केले आहे. त्या बखरकारांनी निर्माण केलेली संभाजी महाराजांची प्रतिमा खरी आहे काय ? बखरींचा आधार घेऊन केलेले इतिहास लेखन खरे आहे काय ? ते लिखन इतिहास लेखनशास्त्राचे नियम पाळून घेतले आहे काय ? इतिहास लेखकांनी मांडलेला संभाजी खरा आहे काय ? यांनी पुरावा म्हणून

कोणत्या ऐतिहासिक साधनांचा उपयोग केला आहे. पुरावे न देता कल्पनेचा वारु मोकळा सोडला आहे काय ? अशी मांडणी करतेवेळी त्यांचा हेतु कोणता होता ? संभाजी महाराजांना बदनाम करण्याचा हेतु होता काय ? इ.स. १९६० नंतरच्या इतिहास संशोधकाने मांडलेला संभाजी वास्तविक आहे काय ? संभाजी महाराजांच्या चरीत्राचे उदात्तीकरण करीत असताना इतिहास लेखन शास्त्राचे नियम पाळलेत काय ? अशा अनेक प्रश्नांची मालिका तयार होते. या सर्व प्रश्नांची उत्तरे शोधण्याचा प्रयत्न प्रस्तुत शोध प्रबंधात करण्यात येणार आहे.

२) संशोधनाचा आढावा व अधिक संशोधनाची गरज :

छत्रपती संभाजी महाराजांच्या चरित्राविषयी अनेक लेखकांनी लेखन केले आहे. यामध्ये मराठ्यांचा इतिहासकार गँड डफ, गो.स. सरदेसाई, म.गो. रानडे, वा.सी. बेंद्रे, कमल गोखले इ. इतिहासकारांनी लेखन केले आहे. या इतिहास लेखनावर एकत्रित चिकित्सा कोणत्याच अभ्यासकाने केली नाही. अ.रा. कुलकर्णी, नरहर कुरूंदकर या लेखकांनी संभाजी महाराजांवरील ऐतिहासिक चरित्राची चिकित्सा केली आहे. पण ती एका-एका चरित्रापुरती मर्यादीत आहे. संभाजी महाराजावरील अनेक चरित्राची एकत्रित चिकित्सा केली नाही. म्हणून अधिक अभ्यासाची व संशोधनाची आवश्यकता आहे. ती आवश्यकता पूर्ण करण्याचा प्रयत्न प्रस्तुत शोधप्रबंधात करण्यात येणार आहे.

३) संशोधन विषयाचे महत्त्व :

छत्रपती संभाजी महाराजांच्या चरित्राविषयी अनेक इतिहास संशोधकांनी संशोधन केले आहे. पण त्या संशोधकांनी लिहिलेल्या चरित्र लिखानाचा चिकित्सक अभ्यास करण्यात आला नाही. वेगवेगळ्या इतिहासकारांनी वेगवेगळ्या पध्दतीने संभाजी महाराजांच चरित्र मांडले आहेत. यात क्रुर, संतपाी, व्यसनी इत्यादी प्रकारचा संभाजी जनतेसमोर उभा केला. तर पराक्रमी, ज्वलन जलन, तेजस, धाडसी, स्वराज्यरक्षक इ. प्रकारचा संभाजी मांडला आहे. एडवर्डकार म्हणतात की, घटीते स्वतः बोलत नाहीत तर त्यांना बोलते करणारा इतिहासकार असतो. म्हणून तो एखादा चरित्रनायक घटितांच्या आधारे चांगला किंवा वाईट ठरवायचा हे इतिहाकारांच्या हातात असते. संभाजी महाराजावर इतिहास लेखन करणाऱ्या सुरुवातीच्या इतिहासकारांनी संभाजी वाईट ठरवला. नंतरच्या इतिहासकारांनी संभाजी महाराजांची नवीन दृष्टिकोनातून पाहणी करुन

खरा वास्तवदर्शी, संभाजी मांडण्याचा प्रयत्न करण्यात येणार आहे. इतिहास लेखनातील चुका सुधारुन नवा व खरा इतिहास मांडणेच संशोधनाचा खरा हेतू आहे. एखाद्या लढाईचे मूल्यमापन करीत असतांना इतिहासकाराकडून काही चुका झाल्या तर त्या क्षम्य मानता येतील. पण एखाद्या महापुरुषाचे चरित्र वाईट ठरवून त्यांची प्रतिमा जनसामान्यात मलीन केली जात असेल तर ती चुक मानता येणार नाही. म्हणून छत्रपती संभाजी महाराजावरील ऐतिहासिक लिखानाचा चिकित्सक अभ्यास करुन चरित्रांची वास्तवदर्शी चिकित्सा करणे आवश्यक आहे. चरित्रांचा अभ्यास करणे आवश्यक आहे. म्हणून ''छत्रपती संभाजी महाराजावरील ऐतिहासिक लिखानाचा चिकित्सक अभ्यास'' हा विषय महत्त्वाचा आहे. म्हणून मी हा विषय माझ्या संशोधनासाठी निवडला आहे.

४) विषय निवडीचा उद्देश :

मराठ्यांच्या इतिहासाविषयी विपूल बखर वाङमयाबरोबरच तत्कालीन अनेक कागदपत्रे उपलब्ध आहेत. संभाजी महाराजांच्या चरित्र लेखकासमोर सर्व कागदपत्र उपलब्ध होती पण काही इतिहासकार बखर वाङमयाने प्रभावित होऊन संभाजी महाराजाविषयी पूर्वगृहदुषितपणा निर्माण झाला. त्या इतिहासकारांनी मूळ कागदपत्रांची छाननी न करता बखर वाङमयातल्या संभाजी खरा मानून चरित्र लेखन केले आहे, या चरित्रलेखकांच्या विधानातच विसंगतपणा दिसून येतो. उदा. सरदेसाई लिहितात की, सेनापती हंबीरराव मोहिते १६८७ साली मारला गेला. ह्या वेळेपर्यंत संभाजी हयात होता. यानंतर मात्र तो कलुशाच्या पूर्णपणे आहारी गेला. येसूबाईचे वजन संभाजीवर दांडगे होते. म्हणजे सरदेसाईंना म्हणायचे आहे की, कलुशाच्या आहारी गेलेला संभाजी येसुबाईच्य धाकात होता. तिच्याशी एकनिष्ठ होता. शिवाय तो विलासी व चैनी होता. अकराव्या वर्षी संभाजीला व्यसन लागले तरी १६८७ पर्यंत तो निट वागत होता असे काही विसंगत चमत्कारीक सरदेसाई लिहितात. असे विसंगत लिखान व घटीकाचा आधार घेऊन चुकीचे निष्कर्ष अनेक इतिहासकारांनी काढले आहेत. म्हणून संशोधकाने जाणीवपूर्वक चुकीचे निष्कर्ष व विसंगतीवर बोट ठेवण्यासाठी ''छत्रपती संभाजी महाराजावरील ऐतिहासिक लिखानाचा चिकित्सक अभ्यास'' हा विषय निवडला आहे. याचबरोबर कोणत्या चरित्र लेखकाने

कसा (चांगला की वाईट) छत्रपती मांडला आहे, याचा अभ्यासदेखील संशोधकला अपेक्षित आहे.

५) संशोधनाची उद्दिष्टे :

१) छत्रपती संभाजी महाराजांच्या वास्तव चरित्राचा अभ्यास करणे.

२) संभाजी महाराजावरील ऐतिहासिक लिखानाचा आढावा घेणे.

३) अकार्यक्षम, उग्र, संतापी, चैनी, विलासी इ. प्रकारचे आरोप करणाऱ्या चरित्राचे परिक्षण करणे.

४) पराक्रमी, धाडसी, स्वराज्य संरक्षक इ. प्रकारच्या चरित्राचे विवेचन करणे.

५) छत्रपती संभाजी महाराजावरील चरित्राची वास्तवदर्शी चिकित्सा करणे.

६) संशोधनाची मर्यादा :

छत्रपती संभाजी महाराजांच्या चरित्रावर विपूल लेखन आले आहे. लेखन प्राथमिक कागदपत्राचा अभ्यास करुन केले गेले आहे. म्हणून आपणाला या प्रस्तुत शोधप्रबंधात द्वितीय सधन म्हणून ओळखल्या जाणाऱ्या चरित्राचा अभ्यास करावयाचा आहे. या चरित्राचा अभ्यास करण्यासाठी विशिष्ट निवडक इतिहासक अभ्यासक व चरित्र लेखकाचीच चरित्रे अभ्यासासाठी घेतले आहेत. या चरित्राची वास्तवदर्शी चिकित्सा करण्यासाठी मूळ कागदपत्राचा आधार घेण्याचे निश्चित निश्चित करण्यात आले आहे. वेळ, श्रम, पैसा वैयक्तिक मर्यादा शासकीय दफ्तर खात्यातील नियम, मोडी, पर्शियन कागदपत्रे मिळविण्यातील सूर्यकिरणाचा अभाव, पर्शियन, भाषा व लिपि समजण्यातील अडचणी या सर्व मर्यादा लक्षात घेऊन वास्तवदर्शी चिकित्सासाठी मूळ कागदपत्रांचा उपयोग करण्याचे निश्चित केले आहे. प्रस्तुत शोधप्रबंधात संशोधक व मार्गदर्शकाच्या निर्देशानुसार निवडक छत्रपती संभाजी चरित्रांची चिकित्सा करण्याचे ठरवले आहे. तरी संशोधनाची व्याप्ती निवडक चरित्रापुरती मर्यादीत राहील.

७) परिकल्पना :

छत्रपती संभाजी महाराजावरील ऐतिहासक लिखान करणाऱ्यस पूर्वसूरींनी संभाजी महाराजाबद्दल ऐतिहासिक मांडणी करताना त्यांचे चरित्रहनन कण्याचा प्रयत्न पूर्वग्रहदूषित केला

आहे. तथापि उत्तरकालातील इतिहासकारांनी छत्रपती संभाजी महाराजावरील बदनामीकारक आरोप खोडून काढून त्यांच्या चरित्राला न्याय देण्यात प्रयत्न केला.

८) गृहितके :

(१) छत्रपती संभाजी महाराजावरील बखरींची संख्या फार कमी आहे. त्यामधील बहूसंख्य बखरीचे लिखान उत्तरकाळामध्ये झाले आहे.

(२) छत्रपती संभाजी महाराजांच्या ऐतिहासिक लिखान फार कमी झाले आहे.

(३) संभाजी महाराजांच्या इतिहासावर कागदपत्रे मुबलक नसली तरी पुरेशा प्रमाणात उपलब्ध आहेत.

९) संशोधन पध्दती :

प्रस्तुत संशोधन हे ऐतिहासिक लिखानाची चिकित्सा करणारे संशोधन आहे. त्यामुळे यासाठी ऐतिहासिक संशोधन पध्दतीचा वापर करण्यात येणार आहे. लिखानासाठी वर्णनात्मक व विश्लेषणात्मक संशोधन पध्दतीचा उपयोग करण्यात येणार आहे. छत्रपती संभाजी महाराजावरील ऐतिहासिक लिखानाची चिकित्सा करावयाची असल्याने निवडक चरित्राचे परिक्षण करुन संभाजी महाराजाच्या गुणदोषांचे विवेचन करण्यात येणार आहे.

१०) संशोधनाची साधने :

प्रस्तुत शोधप्रबंधात संभाजी महाराजावरील ऐतिहासिक ग्रंथांचा अभ्यास अपेक्षित असल्याने ते ग्रंथ ऐतिहासिक साधनामध्ये दुय्यम दर्जाची मानली जात असल्याने प्रामुख्याने संशोधक दुय्यम ग्रंथांचा आधार घेणार आहे. पण या ग्रंथांचे परिक्षण करतेवेळी मूळ कागदपत्रे व समकालीन साधनांचा आधार घेण्यात येणार आहे.

प्रकरण योजना :

प्रस्तुत शोध प्रबंधाची एकूण सहा प्रकरणात मांडणी करण्यात आलेली असून ती खालीलप्रमाणे आहे.

(१) संभाजी महाराजांचे जीवन व कार्य.

(२) छत्रपती संभाजी महाराजावरील ऐतिहासिक लिखानाचा आढावा.

(३) बखर वाङमयातून प्रतिबिंबित होणारे संभाजी.

(४) इतिहास ग्रंथातून प्रतिबिंबित होणारे संभाजी.

(५) छत्रपती संभाजीची वास्तवदर्शी चिकित्सा.

(६) निष्कर्ष.

प्रकरण १ ले - संभाजी महाराजांचे जीवन व कार्य :

प्रस्तुत प्रकरण हे छत्रपती संभाजी महाराजांच्या जीवन व कार्याविषयी आहे. यात संभाजी महाराजांच्या आयुष्यातील प्रमुख घटनांचा आढावा घेण्यात येणार आहे. यात संभाजी महाराजांचे बालपण, युवराज, छत्रपती झाल्यावर केलेल्या कार्याचा आढावा घेण्यात येणार आहे. याचबरोबर छत्रपती छत्रपती झाल्यावर इंग्रज, फ्रेंच, पोर्तुगीज या परकीय सत्ताशी संबंध, अदिलशहा, कुतुबशहा, मोगल बादशहा व जंजिऱ्याच्या सिद्दीशी झालेल्या संघर्षाची माहिती दिली जाणार आहे. सुरुवातील चरित्र समजून घेतल्यावर त्या झालेल्या लिखानाची चिकित्सा आपल्याला करता येते.

प्रकरण २ रे - छत्रपती संभाजी महाराजावरील ऐतिहासिक लिखानाचा आढावा :

छत्रपती संभाजी महाराजावर अनेक इतिहासकारांनी लेखन केले आहे. प्रस्तुत प्रकरणात संभाजी महाराजावर झालेल्या ऐतिहासिक लिखानाचा आढावा घेण्यात येणार आहे. यात ग्रँडडफ, सरदेसाई पासून आधुनिक नव चरित्रकारांचे प्रयत्न, संभाजी चरित्रांचा आढावा घेण्यात येणार आहे.

प्रकरण ३ रे - बखर वाङमयातून प्रतिबिंबित होणारे संभाजी :

संभाजी महाराजावर बखर वाङमयातून लिखान झालेले आहे. यामध्ये सभासद बखर, चिटणीस बखर इत्यादींचा समावेश होतो. बखर वाङमयातून संभाजी महाराजांवर पूर्वग्रहदूषित पक्षपतीपणाने बदनामीकारक आरोप केले आहेत. नंतरच्या इतिहासकारांनी या बखरीतील आरोपांची शहानिशा न करता ते आरोप खरे मानून इतिहास लेखन केले आहे. म्हणून बखर वाङमयात संभाजी महाराजाबद्दल काय लिहिले आहे, याचा आढावा या प्रकरणात घेण्यात येणार आहे.

प्रकरण ४ थे - इतिहास ग्रंथांतून प्रतिबिंबित होणारे संभाजी :

बखर प्रमाण मानून, संभाजी महाराजांच्या चरित्राचे लिखन ग्रँड डफ, सरदेसाई इ. इतिहासकारांनी केले आहे. त्यामुळे संभाजी महाराजावर अनेक बदनामीकारक आरोप करण्यात आले आहेत. याचबरोबर वा.सी. बेंद्रे, कमल गोखले, जयसिंगराव पवार यांनी नवसंशोधनानुसार पराक्रमी व वास्तवदर्शी संभाजी मांडला आहे. या सर्व चरित्रांचा विस्ताराने अभ्यास प्रस्तुत प्रकरणात करण्यात येणार आहे.

प्रकरण ५ वे - छत्रपती संभाजीची वास्तवदर्शी चिकित्सा :

प्रस्तुत प्रकरणामध्ये छत्रपती संभाजी महाराजावरील ऐतिहासिक लिखानाची चिकित्सा करण्यात आली आहे. उत्तरकालीन इतिहासकार व इतिहासकारांनी मांडलेल्या संभाजी महाराजांची चिकित्सा करण्यात येणार आहे. संभाजी महाराजावर करण्यात आलेल्या आरोपांचे सविस्तर विवेचन करण्यात येणार आहे.

प्रकरण ६ वे - निष्कर्ष :

या प्रकरणात संशोधन आणि अभ्यासातून निघालेला निष्कर्ष दिले जाणार आहेत. प्रस्तुत संशोधन आराखडा स्थूल स्वरुपाचा असून संशोधना दरम्यान त्यामध्ये बदल होण्याची शक्यता आहे.

संदर्भ ग्रंथ :

१) गोखले कमल, शिवपुत्र संभाजी, ज्ञानविज्ञान, विकास मंडळ, पुणे.

२) जोशी शं.ना. (संपा.) संभाजीकालीन पत्रसार संग्रह, भा.इ.सं. मंडळ स्वीय ग्रंथमाला, पुणे, १९४९.

३) पगडी सेतु माधवराव (संपा.), मराठे व औरंगजेब, ज्ञानराज प्रकाशन, पुणे, १९६३.

४) पगडी सेतु माधवराव (संपा.), मराठ्यांचे स्वातंत्र्य युध्द, जोशी लोखंडे प्रकाशन, पुणे, १९६२.

५) पगडी सेतु माधवराव (संपा.) मोगल मराठा संघर्ष, चित्रशाळा प्रेस, पुणे, १९६४.

६) पगडी सेतुमाधवराव (संपा.), हिंदवी स्वराज्य आणि मोगल, १९६६.

७) पिसुर्लेकर पां.सं., पोर्तुगीज मराठे संबंध अर्थात पोर्तुगीजांच्या दप्तरातील मराठ्यांचा इतिहास, पुणे विद्यापीठ, पुणे, १९६०.

८) बेंद्रे वा.सि., (संपा.), छत्रपती संभाजी महाराज, पार्श्व पब्लिकेशन, पुणे, १९६०.

९) बेंद्र वा.सि. (संपा.), महाराष्ट्र इतिहासाची साधने, विभाग १, २, ३, मुंबई, १९६६.

१०) बेंद्र वा.सि. (संपा.), साधनचित्र किसा, पुणे.

११) वेलणकर ह.दा. (संपा.), बुधभूंषणम छत्रपती संभाजी महाराज कृत, भांडारकर ओरिएंटल इन्स्टिट्यूट, पुणे, १०२६.

१२) सरदेसाई गो.स., ऐतिहासिक घराण्यांच्या वंशावळी, १९३७.

१३) सरदेसाई गो.स., मराठी रियासत (पूर्वाध) उग्रपृकृती संभाजी के.भी ढवळे, मुंबई, १९३५.

१४) Hatalkar V.G., Relation between the French and Marathas (1968-1815), Bombay, 1958.

१५) असे होते मोगल (मनुयीकृत Storia Do Mogol या ग्रंथाचा अनुवाद) अनु. ज.स. यौनक, महाराष्ट्र राज्य साहित्य संस्कृती मंडळ, मुंबई, १९७४.

१६) मल्हार रामराव चिटणीस, रचात श्रामंत छत्रपती संभाजी महाराज यांचे चरित्र (मराठी) संपा. का.ना. साने आवृत्ती ३ री, पुणे, १९१५.

१७) शिवछत्रपती यांची वखर (मराठी), ले. कृष्णाजी अनंत सभासद, संपा. का.ना. साने, पुणे, १९३७.

१८) छत्रपती संभाजी स्मारक ग्रंथ, जयसिंगराव पवार.

१९) संभाजी आणि रायगड, शां.वि. आवळसकर

२०) जदुनाथ सरकार, History of Huraggeb- औरंगजेबाच्या दरबारचे अखबार ङ संपा. ग.ह. खरे.

२१) ज्वलज्वलनतेजस संभाजीराजा, सदाशिव शिवदे, डायमंड प्रकाशन, २००८.

२२) पवार जयसिंगराव, मराठेशाहीचा मागोवा, मंजुश्री प्रकाशन, १९९३.

२३) ग्रँड डफची मराठ्यांची बखर (अनु. डेव्हीड केपन साहेब), १९१६.

२४) पगडी सेतुमाधवराव नियतीच्या विळख्यात औरंगजेब, परचुरे प्रकाशन, मुंबई, १९९.

२५) देशमुख विजयराव, राजा शंभू छत्रपती सेवा प्रतिष्ठान प्रकाशन, नागपुर, १९८८.

२६) ग.ह. खरे, अ.रा. कुलकर्णी संपा.), मराठ्यांचा इतिहास खंड दुसरा, पुणे, म.वि.ग्र.नि.मं., १९८६.

२७) केळकर न.चि., मराठे व इंग्रज, मॉर्डन बुक डेपो, पुणे, १९६३.

२८) कुलकर्णी स.रा., मराठ्यांचा इतिहास साधन परिचय (संपा.), पुणे, डायमंड पब्लिकेशन, २००८.

मार्गदर्शक

डॉ. पिसे जी.एस.
सहाय्यक प्राध्यापक व संशोधन मार्गदर्शक
इतिहास विभाग
ज्ञानोपासक महाविद्यालय, परभणी
जि. परभणी (महाराष्ट्र)

संशोधक

शिंदे संदिप शिवाजीराव
एम.ए., सेट,
परभणी, जि. परभणी (महाराष्ट्र)